सुप्रीम कोर्टाने लैंगिक कामगारांचे अधिकार राखले आहेत. आणि राज्य अधिकाऱ्यांना त्यांच्या घटनात्मक हक्कांची खात्री करून हमी देण्याचे निर्देश दिले आहेत. तथापि, ते प्रत्यक्षात अंमलात आणले जात नाहीत तो पर्यंत ते फक्त कागदावरचे शब्दच राहतील. सदरच्या माहिती पत्रकाचा उद्देश हा आहे कि, सुप्रीम कोर्टाने दिलेल्या शिफारसी ज्या लैंगिक कामगारांच्या जीवनाशी आणि कामाशी संबंधित आहे त्या बाबतीत जनजागृती करणे.

सदरचे माहिती पत्रक १९ मे २०२२ मधील बुद्धदेव कर्मास्कर विरुद्ध युनियन ऑफ इंडिया च्या कोर्ट ऑर्डर वर आधारित आहे. जनजागृतीच्या उद्देश्याने सहज सुलभ भाषेचा उपयोग करण्यात आलेला आहे.

**संपदा ग्रामीण महिला संस्था (संग्राम)**
**पत्ता:** बालजगत, पार्श्वनाथ इंग्लिश मिडियम स्कूल मागे, कुपवाड रोड,
बालाजीनगर, सांगली. ४१६ ४१६, महाराष्ट्र (इंडिया)

www.sangarm.org / sangramsanstha@gmail.com

# आमच्या हक्कांचे पालन करणे

## सुप्रीम कोर्टाने लैंगिक कामगारांना मान्यता दिली



## पार्श्वभूमी

१९ मे रोजी भारताच्या सुप्रीम कोर्टाने लैंगिक कामगारांच्या अधिकारांच्या बाबतीत निर्देश जारी केले आहेत. बुद्धदेव कर्मास्कर विरुद्ध युनियन ऑफ इंडिया यांच्यातील हे प्रकरण २०१० पासून चालू आहे. २०११ मध्ये सुप्रीम कोर्टाने आपल्या इंटरिम ऑर्डर मध्ये असे नमूद केलेले आहे कि या देशातील प्रत्येक व्यक्तीला भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २१ नुसार सन्मानपूर्वक जीवन जगण्याचा अधिकार आहे ते सर्व अधिकार लैंगिक कामगारांना लागू आहेत. यावर शिफारशी देण्यासाठी २०११ मध्ये सुप्रीम कोर्टाने एक पॅनेल स्थापन केले

(टीओआर) ३ नुसार भारताच्या राज्यघटनेच्या अनुच्छेद २१ च्या अनुषंगाने सन्मानाने लैंगिक कार्य म्हणून काम करणे सुरू ठेवू इच्छिणाऱ्या लैंगिक कामगारांसाठी अनुकूल परिस्थिती करून द्यावी अशी सुप्रीम कोर्ट पॅनेलने न्यायालयाला तपशीलवार शिफारस केली.

(टीओआर) ३ चा भाग म्हणून या पॅनेलने अनेक कार्यकर्ते, सामाजिक संस्था, वकील, सेक्स वर्कर, सेक्स वर्कर्स नेटवर्क यांच्याशी भेट घेऊन सेक्स वर्कर्सच्या समस्या आणि आव्हाने समजून घेतली. नॅशनल नेटवर्क ऑफ सेक्स वर्कर्स (एनएनएसडब्ल्यू)च्या सदस्यांनी; ज्यामध्ये - कर्नाटका सेक्स वर्कर्स युनियन (KSWU), वेश्या अन्याय मुक्ती परिषद (VAMP), उत्तर कर्नाटका महिला ओक्कुटू (UKMO), वडामलार फेडरेशन, वुमेन्स इनिशिएटीव्ह (WINS), संपदा ग्रामीण महिला संस्था ( संग्राम) आदींनी सहभाग घेवून अनेक प्रसंगी चर्चा घडवून आणल्या होत्या. तसेच एनएनएसडब्ल्यू च्या सदस्यांनी एकत्र येऊन इटपाच्या समस्या आणि त्यांच्या शिफारशींवर तपशीलवार आपले म्हणणे मांडले. सेक्स वर्कर्सच्या अधिकारांचे संगोपन आणि संरक्षण कसे करता येईल याविषयी सुप्रीम कोर्ट पॅनेलने न्यायालयाला तपशीलवार शिफारसी केल्या. याव्यतिरिक्त, सर्वोच्च न्यायालय हे कोविड १९ महामारीच्या काळात राज्यांना लैंगिक कामगारांना ओळखीची कागदपत्रे न विचारता रेशन देण्यास सांगण्यासाठी सक्रिय होते.

## सर्वोच्च न्यायालयाच्या शिफारशी.

मे २०२२ मध्ये केंद्र सरकारने मान्य केलेल्या शिफारशींवर सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकार आणि केंद्रशासित प्रदेशांना निर्देश दिले. सुप्रीम कोर्टाने राज्य सरकारांना या शिफारशी तातडीने लागू कराव्यात असे निर्देश दिले आहेत.

- **१.** लैंगिक अत्याचाराला बळी पडलेल्या कोणत्याही सेक्स वर्करला तत्काळ वैद्यकीय सोयी आणि सहाय्याबरोबरच लैंगिक अत्याचारातून वाचलेल्या सेक्स वर्कर महिलेला सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत - फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ३५७C नुसार "मार्गदर्शक तत्त्वे आणि प्रोटोकॉल: लैंगिक हिंसाचारातून वाचलेल्या/पीडितांसाठी वैद्यकीय-कायदेशीर काळजी", आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय (मार्च, २०१४)

- **२.** राज्य सरकारांना आयटीपीए अंतर्गत येणाऱ्या सर्व संरक्षक गृहांचे सर्वेक्षण करण्याचे निर्देश दिले जाऊ शकतात. जेणेकरुन त्यांच्या इच्छेविरुध्द अटकेत असलेल्या प्रौढ महिलांच्या प्रकरणांचे पुनरावलोकन केले जाऊ शकते आणि त्यांना वेळेत सोडण्याची प्रक्रिया केली जाऊ शकते.

- **३.**पोलिस आणि इतर कायद्याची अंमलबजावणी कारणाऱ्या व्यवस्थेला लैंगिक कामगारांच्या हक्कांबद्दल संवेदनशील केले पाहिजे. लैंगिक कामगारां देखील सर्व मूलभूत मानवी हक्क आणि राज्यघटनेने सर्व नागरिकांना हमी दिलेले इतर अधिकार देखील आहेत.पोलिसांनी सर्व लैंगिक कामगारांशी सन्मानाने वागले पाहिजे. त्यांचा शाब्दिक आणि शारिरीक गैरवापर करू नये, त्यांच्यावर हिंसाचार करू नये किंवा त्यांना कोणत्याही लैंगिक कृत्यासाठी जबरदस्ती करू नये.

- **४.** प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाने प्रसारमाध्यमांसाठी योग्य मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्यास सांगितले पाहिजे जेणेकरून लैंगिक कामगारांची ओळख, अटक, छापे आणि बचाव कार्य दरम्यान, पीडित किंवा आरोपी म्हणून त्यांची ओळख उघड होऊ नये आणि कोणतीही प्रकारची माहिती प्रकाशित किंवा प्रसारित करू नये. असे फोटो देखील काढू नयेत ज्यामुळे त्यांच्या ओळखी उघड होतीलयाशिवाय, नव्याने लागू करण्यात आलेले कलम ३५४C, IPC जे व्हॉय्युरिझमला(-म्हणजे जेव्हा सेक्स वर्कर्स लैंगिक काम असतात ,नग्न असतात ते पाहून आनंद मिळवणे किंवा त्यांच्या वेदना पाहून आनंद मिळवणे) फौजदारी गुन्हा बनवते, त्याची अंमलबजावणी इलेक्ट्रॉनिक मीडियावर कठोरपणे केली जावी, ज्यामुळे बचाव कार्य करताना माहिती घेण्याच्या नादात लैंगिक कामगाराचे ग्राहकासोबतचे फोटो प्रसारित करण्यास मनाई करावी.

- **५.** लैंगिक कामगार त्यांच्या आरोग्यासाठी आणि सुरक्षिततेसाठी (उदा. कंडोमचा वापर इ.) वापरतात त्या उपायांना गुन्हा म्हणून समजले जाऊ नये किंवा गुन्हा केल्याचा पुरावा म्हणून पाहिले जाऊ नये.

- **६.** केंद्र सरकार आणि राज्य सरकारांनी, राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, राज्य विधी सेवा प्राधिकरण आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्यामार्फत, लैंगिक कामगारांना त्यांच्या अधिकारांबद्दल शिक्षित करण्यासाठी कार्यशाळा घ्याव्यात. ज्यामध्ये लैंगिक कार्याची कायदेशीरता, अधिकार अश्या विषयावर शिक्षण मिळेल आणि पोलिसांचे उत्तर दायित्व काय असावे आणि कायद्यानुसार काय परवानगी आहे/ कश्यावर बंदी आहे याची माहिती द्यावी. लैंगिक कामगारांना त्यांच्या अधिकारांची अंमलबजावणी करण्यासाठी आणि तस्कर किंवा पोलिसांच्या हातून अनावश्यक छळ टाळण्यासाठी त्यांना न्यायिक व्यवस्थेत कसे प्रवेश मिळू शकतो याबद्दल देखील माहिती दिली जाऊ शकते.

## न्यायालयाने दिलेली इतर निरीक्षणे

राज्य सरकार/ केंद्रशासित प्रदेश, आयटीपीएची अंमलबजावणी करणाऱ्या प्राधिकरणांनी पॅनेलच्या शिफारशी आणि कायद्यातील तरतुदींचे पालन केले पाहिजे व्यवसाय असला तरीही, या देशातील प्रत्येक व्यक्तीला भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २१ नुसार सन्मानपूर्वक जीवन जगण्याचा अधिकार आहे

अनैतिक वाहतूक (प्रतिबंध) कायदा, १९५६ अंतर्गत कर्तव्य बजावणाऱ्या अधिकाऱ्यांनी सर्व व्यक्तींना दिलेले घटनात्मक संरक्षण लक्षात ठेवले जाईल.

### आधार कार्ड बाबत

ज्या सेक्स वर्करकडे रहिवासी पुरावा नाही त्यांनाही आधार कार्ड मिळावे, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. व्यक्तीने SACS/NACO च्या लक्ष्यगट - हस्तक्षेप ( टी आय) कार्यक्रमांचा भाग असणे आवश्यक नाही. लक्ष्यगट - हस्तक्षेप ( टी आय) चा भाग असलेल्या लैंगिक कामगारांना प्रकल्प संचालक(PD), SACS द्वारे सत्यापित केलेल्या प्रोफॉर्माच्या आधारे आधार कार्ड मिळू शकतील. कोणत्याही TI चा भाग नसलेल्या लैंगिक कामगारांच्या बाबतीत,ते राज्य विधी सेवा प्राधिकरणाद्वारे पडताळणीनंतर जारी केले जाईल.

सुप्रीम कोर्टाने सेक्स वर्कर्सच्या अधिकारांना अधोरेखित केले आहे आणि त्या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी राज्य सरकारांना आवाहन केले आहे.

**आरोग्य सेवा देणारे**

- वैद्यकीय सहाय्याचा अधिकार आणि लैंगिक अत्याचार किंवा हिंसाचाराचा सामना करणाऱ्या लैंगिक कामगारांना दिलेले सर्व संरक्षण

**पोलीस आणि कायदा अंमलबजावणी करणाऱ्या व्यवस्था.**

- लैंगिक कामगारांच्या मानवी हक्कांबद्दल व संविधान अधिकारं बाबत संवेदनशील राहणे.
- लैंगिक कामगारांशी सन्मानाने वागले पाहिजे, त्यांचा शाब्दिक किंवा शारीरिक गैरवर्तन करू नये,
- लैंगिक कामगारांना हिंसाचाराच्या अधीन करू नये किंवा त्यांना लैंगिक क्रिया करण्यास भाग पाडू नये.

**गुप्तता पाळण्याचा अधिकार -मीडिया**

- छापे आणि सुटकेदरम्यान किंवा अटक करताना छायाचित्रे, व्हिडिओ किंवा सेक्स वर्कर्सची नावे दाखवू शकत नाहीत.

**माहितीचा अधिकार** - NALSA, SLSA, DLSA ने लैंगिक कामगारांना त्यांच्या अधिकारांबद्दल शिक्षित केले पाहिजे.

- लैंगिक कामाची कायदेशीरता,पोलिसांचे अधिकार आणि कर्तव्ये.
- कायद्यानुसार काय परवानगी आहे/ कश्यावर बंदी आहे.
- न्याय व्यवस्थेत ते कसे प्रवेश मिळवू शकतात आणि त्यांच्या अधिकारांची अंमलबजावणी करतात
- तस्कर किंवा पोलिसांकडून अनावश्यक छळ टाळा.

**ओळख दस्तऐवजांचा अधिकार**

- रहिवासी पुराव्याअभावी सेक्स वर्कर्सना आधार कार्ड देणे नाकारले जाऊ शकत नाही
- ज्या महिलांना त्यांच्या इच्छेविरुद्ध ITPA अंतर्गत रेस्क्यू होममध्ये ताब्यात घेण्यात आले आहे, त्यांना तात्काळ सोडण्यात यावे (राज्य सरकारांनी सर्वेक्षण करणे आवश्यक आहे)
- तिच्याविरुद्ध गुन्ह्याचा पुरावा म्हणून कंडोम आणि इतर आरोग्य उत्पादने वापरली जाऊ शकत नाहीत.